# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 03 February 2025
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – ०३ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रस्तावावर चर्चेला प्रारंभ
- त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक लोकसभेत सादर–गुजरातमध्ये आणंद इथं होणार स्थापन
- महाराष्ट्रासाठी रेल्वे अंदाजपत्रकात २३ हजार ७७८कोटी रुपयांची तरतूद
- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र १३ सुवर्ण पदकांसह तिसऱ्या स्थानावर

आणि

- अकरावा गोविंद सन्मान ज्येष्ठ संगीत गुरु विदुषी सीताभाभी राममोहन राव यांना जाहीर

****

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रस्तावावर आज संसदेत चर्चा सुरु झाली. लोकसभेत भाजपाचे रामवीरसिंह बिधुडी यांनी तर राज्यसभेत भाजपच्या किरण चौधरी यांनी चर्चेला प्रारंभ केला. त्यापूर्वी राज्यसभेत कामकाज सुरु झाल्यावर महाकुंभाच्या मुद्यावरुन विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणा द्यायला सुरुवात केली. या आणि इतर मुद्यांवरुन विरोधकांनी दिलेले स्थगन प्रस्ताव सभापती जगदीप धनखड यांनी फेटाळले. त्याच्या निषेधात कॉंग्रेस, समाजवादी पार्टी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रीय जनता दल आणि इतर पक्षांच्या सदस्यांनी सभात्याग केला.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावर बोलतांना, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी, कुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीतल्या मृतांबाबत केलेल्या विधानावर सत्ताधारी पक्षाने आक्षेप घेतला, सभापतींनीही त्यांना हे विधान मागे घेण्याची सूचना केली. तृणमूलचे डेरेक ओ ब्रायन, द्रमुकचे एम षण्मुगम्, शिवसेनेचे मिलिंद देवरा यांनी या चर्चेत सहभाग घेतला.

लोकसभेत भाजपचे रविशंकर प्रसाद, द्रमुकच्या कनिमोळी, तृणमूल काँग्रेसच्या काकोली घोष, समाजवादी पक्षाचे नरेश पटेल, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे डॉ अमोल कोल्हे, शिवसेनेचे श्रीरंग बारणे, यांच्यासह विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या चर्चेत सहभाग घेतला, परराष्ट्र मंत्र्यांच्या अमेरिका दौऱ्याबाबत गांधी यांनी केलेल्या विधानावर संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांच्यासह सत्ताधारी सदस्यांनी आक्षेप घेतला, परराष्ट्र मंत्र एस जयशंकर यांनीही गांधी यांचं हे विधान खोडून काढलं आहे.

****

त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक २०२५ आज लोकसभेत सादर करण्यात आलं. गुजरातमध्ये आणंद इथं हे विद्यापीठ स्थापन होणार असून सहकारातून समृद्धी हे उद्दिष्ट गाठण्याच्या हेतूने व्यवस्थापकीय आणि तांत्रिक शिक्षण तिथे दिलं जाईल. केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर यांनी विधेयक सभागृहात सादर केलं.

****

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरु असलेल्या महाकुंभमेळ्यात वसंत पंचमीनिमित्त तिसरं अमृत स्नान आज सुरु आहे. १३ आखाड्यांमधल्या साधुसंतांसह जगभरातील कोट्यवधी भाविक पवित्र संगमावर श्रद्धा स्नान करत आहेत. दुपारपर्यंत सुमारे सव्वा कोटीहून अधिक भाविकांनी अमृत स्नान केलं आहे.
दरम्यान, यंदाचा हा महाकुंभमेळा सुरू झाल्यापासून आतापर्यंत जवळपास ३५ कोटी भाविकांनी पवित्र स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

कृषी क्षेत्रात एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विचाराधीन असून त्यासाठी व्यवहार्यता तपासून पाहावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. या संदर्भात पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक झाली,

त्यावेळी ते बोलत होते. पीक आरोग्याचं विश्लेषण, मातीतल्या कार्बनचं प्रमाण शोधणं, मातीच्या आरोग्याविषयी सविस्तर माहिती, तणाचे प्रकार ओळखणं, मातीचं तापमान, पिकांवरची कीड तसंच रोगांचा प्रादुर्भाव ओळखणं एआयच्या वापरामुळे शक्य होणार आहे. त्यामुळे एआयच्या प्रायोगिक तत्त्वावर वापरासाठी या प्रकल्पाची तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासून पाहावी, असे निर्देश अजित पवार यांनी दिले.

****

भारतीय – अमेरिकन गायिका चंद्रिका टंडन हिनं आपल्या त्रिवेणी अल्बम करिता ग्रॅमी पुरस्कार पटकावला आहे. लॉस अँजेलिस मध्ये आज हा ६७ वा वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चंद्रिका टंडन यांचं ग्रॅमी पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. भारतीय संस्कृतीवरील प्रेम आणि संगीतकार म्हणून टंडन यांनी केलेल्या कामगिरीचं, पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरील संदेशात कौतुक केलं, टंडन यांची कामगिरी देशवासियांसाठी प्रेरणास्त्रोत असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

****

महाराष्ट्रासाठी रेल्वे अंदाजपत्रकात २३ हजार ७७८कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून पत्रकार परिषद घेत, ही माहिती दिली –

> ***चार लाख साठ हजार करोड के नये बजेट सँक्शन हुये है। महाराष्ट्र का ॲलोकेशन इस बार, रेकॉर्ड ॲलोकेशन है, तेईस हजार सात सौ अठहत्तर करोड रूपये का ॲलोकेशन है। महाराष्ट्र मे काम बहोत तेजी से चल रहा है।***

दक्षिण पूर्व रेल्वे विभागाच्या अंतर्गत ९२ रेल्वे स्थानकापैकी ३० स्थानकं दिव्यांगांसठी सुलभ आणि सोयीस्कर करणार असल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं आहे.

****

कोकण रेल्वेचं विद्युतीकरण १०० टक्के पूर्ण झालं असून, कोकण रेल्वे ही आता हरित रेल्वे झाली आहे. डिझेलसाठीच्या खर्चात दर वर्षी १९० कोटी रुपयांची बचत होत आहे,अशी माहिती कोकण रेल्वेचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

संतोषकुमार झा यांनी दिली. ते आज रत्नागिरीत पत्रकार परिषदेत बोलत होते. याबाबत अधिक माहिती देतांना झा म्हणाले –

***इस इलेक्ट्रीफिकेशन से कोकण रेल्वे हंड्रेड पर्सेंट इलेक्ट्रीफाईड हुआ है। और जो हमारा इंधन का कॉस्ट है, पहले हम डिजेल इंजन से गाडीयां चलाते थे, उसके खर्चे मे अब जो बिजली इंजिन से गाडीयां चलती है, उससे लगभग एक सौ नब्बे करोड की हर साल से बचत हो रही है।***

****

सलग दुसऱ्यांदा १९ वर्षांखालील टी–२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळ–बीसीसीआयने ५ कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलं आहे. १९ वर्षांखालील भारतीय महिला संघाने पहिला टी–२० विश्वचषक २०२३मध्ये शेफाली वर्मा हिच्या नेतृत्वाखाली जिंकला होता. तर निकी प्रसाद हिच्या नेतृत्वाखालील महिला संघाने दुसऱ्यांदा विश्वचषकावर नाव कोरलं.

****

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र १३ सुवर्ण पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. मात्र २५ रौप्य आणि १७ कांस्य पदकं जिंकून महाराष्ट्राने सर्वाधिक ५५ पदकं जिंकली आहेत.

सेना दल संघाला १८ आणि कर्नाटकला १७ सुवर्णपदकं मिळाली आहेत. मणिपूर ११ सुवर्ण पदकांसह चौथ्या तर मध्यप्रदेश ९ सुवर्ण पदकांसह पाचव्या स्थानावर आहे.

****

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेने पहेलवान महेंद्र गायकवाड आणि शिवराज राक्षे यांच्यावर तीन वर्षांची बंदी घातली आहे. या दोन्ही पहेलवानांनी महाराष्ट्र केसरी स्पर्धेत पंचांशी वाद घालत आक्षेपार्ह वर्तन केल्या प्रकरणी ही कारवाई करण्यात आल्याची माहिती कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष रामदास कदम यांनी दिली आहे.

****

अकरावा गोविंद सन्मान ज्येष्ठ संगीत गुरु विदुषी सीताभाभी राममोहन राव यांना जाहीर झाला आहे. अकरा हजार रुपये, सन्मानपत्र आणि शाल असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. सीताभाभी या गेली सात दशके संगीत क्षेत्रात कार्यरत आहेत. येत्या २८ मार्चला छत्रपती संभाजीनगर इथं गोविंद देशपांडे स्मृति सोहळ्यात हा पुरस्कार

प्रदान केला जाईल. गरूड ॲडस् चे संस्थापक आणि जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै. गोविंद देशपांडे यांच्या स्मृती निमित्त गेली १८ वर्षे या स्मृती सोहळ्याचं आयोजन करण्यात येतं.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेतर्फे दिला जाणारा वि. वा. देसाई स्मृती पुरस्कार छत्रपती संभाजीनगर इथल्या 'मुक्तिसोपान न्यास संस्थे'ला जाहीर झाला आहे. स्मृतिचिन्ह आणि पंधरा हजार रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. आज हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केला जाणार आहे.

****

बीड इथल्या स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात येत्या १३ आणि १४ फेब्रुवारी रोजी "भारतरत्न नानाजी देशमुख ॲनआर्किटेक ऑफ रुरल डेव्हलपमेंट इन इंडिया" या विषयावर राष्ट्रीय परिषद होणार आहे. या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेमध्ये नानाजी देशमुख यांनी केलेल्या ग्रामीण विकासाच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांनी दिली.

****

छत्रपती संभाजीनगर इथं विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांना ब्राह्मण महिला मंच, आणि यशस्वी उद्योजिका समूह यांच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. विविध क्षेत्रातील महिलांना सेवा रत्न, समाज रत्न, शिक्षण रत्न, आरोग्य रत्न, कलारत्न आणि उद्योग रत्न असे विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले.

****

नांदेड विभागात रेल्वे तिकीट खिडकीवर तिकीट खरेदी करण्यासाठी नांदेड विभागातील सर्व ७० स्थानकांवर QR कोड सुविधा विस्तारीत करण्यात आली आहे. रेल्वे वापरकर्त्यांसाठी कॅशलेस व्यवहाराची ही सुविधा सुरुवातीला महत्त्वाच्या स्थानकांच्या प्रमुख काउंटरवर लागू करण्यात आली होती, ती आता विभागातील सर्व काउंटरवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सर्व रेल्वे वापरकर्त्यांना तिकिट खरेदीसाठी या संधीचा उपयोग करण्याचं आवाहन विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नीति सरकार यांनी केलं आहे.

****